नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक
# यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - ४ रे | Year - 4rd | अंक - ११ | Issue - 11 | वार - शुक्रवार दि. ५ जून २०२६ | Blow- Friday Date 5 JUNE 2026 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com | वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ | Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये | Amout - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 | ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com


# केरळात मान्सूनचे आगमन

## महाराष्ट्रात ऑरेंज अलर्ट जारी; विदर्भात मान्सून पूर्व पाऊस कोसळणार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नागपूर : मान्सूनचे अखेर केरळमध्ये आगमन झाले आहे. यंदा तो नेहमीपेक्षा सुमारे तीन दिवस उशिराने दाखल झाला आहे. हवामान विभागाच्या माहितीनुसार, सध्या मान्सूनच्या पुढील वाटचालीसाठी परिस्थिती अनुकूल बनत असून येत्या काही दिवसांत दक्षिण महाराष्ट्रातही मान्सून दाखल होण्याची शक्यता आहे. मात्र विदर्भातील नागरिक आणि शेतकऱ्यांना अजून काही दिवस प्रतीक्षा करावी लागणार आहे. विदर्भात १५ जूननंतरच मान्सूनच्या आगमनाची शक्यता वर्तविण्यात आली आहे.

हवामान विभागाचे वैज्ञानिक प्रवीण कुमार यांनी याबाबत महत्त्वाची माहिती दिली आहे. विदर्भात साधारणपणे १० ते १५ जून दरम्यान मान्सूनचे आगमन होत असते. यापूर्वीच्या वर्षांमध्येही याच



कालावधीत मान्सून दाखल झाल्याचे दिसून आले आहे. काही वेळा तो लवकर तर काही वेळा उशिरानेही पोहा-चतो. सध्या मात्र विदर्भासाठी मान्सूनच्या आगमनास आवश्यक असलेली अनुकूल परिस्थिती तयार झालेली नसल्याने त्याच्या आगमनाची निश्चित तारीख अद्याप जाहीर करण्यात आलेली नाही, असं शास्त्रज्ञ प्रवीण कुमार यांनी सांगितलं.

राज्यातील तीन जिल्ह्यांना पावसाचा ऑरेंज अलर्ट

दरम्यान, पुढील दोन ते तीन दिवस विदर्भातील काही जिल्ह्यांमध्ये मान्सूनपूर्व पावसाचा प्रभाव दिसून येणार आहे. हवामान विभागाने वर्धा, यवतमाळ आणि चंद्रपूर या जिल्ह्यांसाठी ऑरेंज अलर्ट जारी केला आहे. या भागांमध्ये हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसासह मेघगर्जना आणि जोरदार वाऱ्यांची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. काही ठिकाणी गारपीट होण्याचाही अंदाज वर्तविण्यात आला आहे, अशी माहिती प्रवीण कुमार यांनी दिली.

हवामान विभागाच्या अंदाजानुसार, या कालावधीत वाऱ्यांचा वेग ताशी ५० ते ६० किलोमीटरपर्यंत पोहोचू शकतो. त्यामुळे नागरिकांनी तसेच शेतकऱ्यांनी आवश्यक ती खबरदारी घेण्याचे आव-ाहन करण्यात आले आहे.

हवामान विभागाकडून शेतकऱ्यांना मोलाचं आवाहन

विदर्भात सध्या ढगाळ वातावरण निर्माण होत असले तरी तापमानात विशेष घट होण्याची शक्यता नाही. पुढील काही दिवस विदर्भात कमाल तापमान ४० ते ४२ अंश सेल्सिअसच्या दरम्यान राहण्याचा अंदाज आहे. मात्र १० जूननंतर तापमानात काही प्रमाणात घट होऊ शकते, असे हवामान विभागाने स्पष्ट केले आहे. तर सध्या पडणारा पाऊस हा मान्सूनपूर्व स्वरूपाचा असल्याने केवळ या पावसाच्या आधारावर पेरणीची घाई करू नये. पुरेसा आणि सातत्यपूर्ण पाऊस झाल्यानंतरच खरीप हंगामातील पेरणी सुरू करावी, असे आवाहन हवामान विभागाकडून करण्यात आले आहे.

# राज्यात नवे पुनर्वसन धोरण येणार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

**मंत्री मकरंद जाधव-पाटील; कालानुरूप सर्व बदल समाविष्ट करणार**

मुंबई : राज्यातील दरडप्रवण गावांचे कायमस्वरूपी पुनर्वसन, जुन्या प्रकल्पांमधील गावठाणांमध्ये नागरी सुविधा पुरवणे आणि पूरग्रस्त भागातील गावांचे सुरक्षित स्थलांतर सुलभ करण्यासाठी राज्य सरकार लवकरच एक नवे आणि सर्वसमावेशक 'पुनर्वसन धोरण' आणणार आहे. मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव-पाटील यांनी गुरुवारी याबाबत माहिती दिली. या नव्या धोरणामध्ये आपद्ग्रस्तांना दिल्या जाणाऱ्या जागेच्या क्षेत्रफळात वाढ करणे, घरकुल अनुदानाच्या रक्कमेत वाढ करणे आणि पुनर्वसन वसाहतींमध्ये आधुनिक सोयी-सुविधांचा समावेश करणे या बाबींचा प्रामुख्याने समावेश केला जाईल, असे स्पष्ट करत हे धोरण कालानुरूप आणि सर्वसमावेशक असेल, असे निर्देश त्यांनी प्रशासनाला दिले.

मंत्रालयात आयोजित मदत व पुनर्वसन विभागाच्या उच्चस्तरीय बैठकीत ते बोलत हो-ते. विभागाच्या प्रधान सचिव विनिता सिंगल यांच्यासह व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे राज्यातील सर्व विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी आणि जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी उपस्थित होते. या बैठकीत मंत्री जाधव-पाटील यांनी अधिकाऱ्यांना स्पष्ट केले की, १४ ऑक्टोबर २०२२ च्या शासन निर्णयातील जुने निकष बदलून नागरिकांच्या हिताचे नवीन धोरण जलदगती-ने तयार करण्यात येईल. तसेच हे नवीन धोरण आणल्यानंतर पुनर्वसनाचे सर्व आगामी प्रस्ताव स्थानिक लोकप्रतिनिधींना विश्वासात घेऊनच सुधारित स्वरूपात सादर केले जावेत, असे आदेश त्यांनी दिले.यंदा राज्यात पाऊस कमी पडण्याची शक्यता हवामान खात्याने वर्तवल्याच्या पार्श्वभूमीवर, प्रशासनाने पाणी टंचाई निवारणाच्या उपाययोजनांना सर्वोच्च प्राधान्य द्यावे, असे निर्देश मंत्री मकरंद जाधव-पाटील यांनी दिले. सर्व जिल्हाधिकाऱ्यांनी आगामी १५ ऑगस्टपर्यंतच्या पाणी वितरणाचे चोख नियोजन करावे. नागरिकांची पाण्यासाठी होणारी गैरसोय टाळण्यासाठी आवश्यकतेनुसार विहिरी अधिग्रहित कराव्यात; तसेच स्थानिक लोकप्रतिनिधींशी चर्चा करून गरज भासल्यास चारा छावण्यांचे रीतसर प्रस्ताव शासनाकडे सादर करावेत, अशा सूचना त्यांनी दिल्या.

'ॲग्रीस्टॅक' डेटा तातडीने अपडेट करा

खरीप हंगाम २०२५-२०२६ मधील अतिवृष्टी आणि अवकाळी पावसामुळे बाधित झालेल्या शेतकऱ्यांची मदत रखडू नये, यासाठी जिल्हाधिकाऱ्यांनी 'ग्रीस्टॅक' डेटा तातडीने तप-ासावा. राज्यातील एकही पात्र शेतकरी शासनाच्या मदतीपासून वंचित राहू नये, यासाठी वेगाने 'ई-केवायसी' आणि डेटा अपडेटची मोहीम राबवावी. ज्या शेतकऱ्यांना अद्याप मदत मिळालेली नाही, त्यांच्यासाठी विशेष शिबिरे (कॅम्प) आयोजित करून तातडीने निधी वितरित करावा, असे आदेश त्यांनी दिले. तसेच, शेतकरी आत्महत्या प्रकरणांमधील प्रलंबित प्रकरणांतील त्रुटींची पूर्तता करून ही प्रकरणे प्राधान्याने आणि तात्काळ निकाली लावण्याचे निर्देश त्यांनी प्रशासनाला दिले. आपत्तीच्या काळात मनुष्यहानी, जखमी व्यक्ती, पशुहानी, घरगुती सामान, तसेच लहान दुकानदार व टपरीधारक यांना मिळणारी मदत स्थानिक प्रशास-नाने विहीत कालावधीत आणि संवेदनशीलतेने वितरीत करावी, अशी सूचनाही त्यांनी दिली.

# ३४ प्रवाशांना वाचवण्यासाठी बस चालकानं स्वत:चा जीव गमावला

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

देहरादून: राज्य परिवहन मंडळाच्या बसच्या चालकानं दाखवलेल्या प्रसंगावधानामुळे ३४ प्रवाशांचा जीव वाचला. पण या दुर्घटनेत बस चालकाचा मृत्यू झाला. बुधवारी सकाळी दहाच्या सुमारास हा अपघात झाला. प्रवाशांचा जीव वाचव-ताना स्वत:चा जीव गमावणाऱ्या बस चालकाबद्दल हळहळ व्यक्त होत आहे. ही घटना उत्तराखंड चंपावत जिल्ह्यातील ऑल वेदर रोडवर मरोडाखान परिसरात घडली.

उत्तराखंड राज्य परिवहन मंडळाची बस धारचुलाहून टनकपूरला जात होती. बस उतरणीवर असताना अच-ानक ब्रेक झाला. बसमध्ये असलेल्या प्रवाशांच्या जीवाला धोका होता. परिस्थितीचं गांभीर्य लक्षात घेत बेनीराम थ्वाल (४९) यांनी समयसूचकता दाखवत मोठा निर्णय घेतला. त्यांनी बस रस्त्याच्या कडेला असलेल्या डोंगराच्या दिशेनं वळवली. त्यामुळे बस थांबली आणि मोठा अपघात टळला.

बेनीराम यांनी प्रसंगावधान राखत मोठा अनर्थ टाळला. पण बस डोंगराला धडकताच बेन-ीराम बाहेर फेकले गेले. बसच्या पुढील चाकाखाली आल्यानं त्यांचा जीव गेला. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, बसमधील ३४ प्रवाशांपैकी एका महिलेला किरकोळ दुखापत झाली आहे. बाकीचे सर्व प्रव-ासी सुखरुप आहेत. जखमी झालेल्या महिलेला उपचारांसाठी लोहाघाट उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे.

उत्तराखंड राज्य परिवहन महामंडळाचे टनकपूर विभागाचे सहायक विभागीय व्यवस्थापक सुरेशा पांडे यांनी बेनीराम यांनी दाखवलेल्या कर्तव्यदक्षतेचं आणि समयसूचकतेचं कौतुक केलं. 'त्यांनी स्वत:च्या जीवाची फिकीर न करता बस डोंगराला धडकवण्याचा निर्णय घेतला. यामुळे सगळ्या प्रवाशांचा जीव वाचला,' अशा शब्दांत पांडे यांनी बेनीराम यांच्या कामाची स्तुती केली. या अपघातानंतर परिसरावर शोककळा पसरली.

## महाविकास आघाडीची निवडणुकीआधीच माघार

# विधानपरिषदेच्या १७ पैकी ६ जागा बिनविरोध

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या १७ रिक्त जागांसाठी जाहीर झालेल्या विधान परिषद निवडणुकीच्या रणसंग्रामात गुरुवारी अर्ज माघारीच्या शेवटच्या दिवशी अत्यंत नाट्यमय घडाम-ोडी घडल्या. संख्याबळाचे गणित अनुकूल नसल्याने महाविकास आघाडीच्या (मविआ) अधिकृत उमेदवारांसह अनेक बंडखोरांनी निवडणुकीच्या रिंगणातून माघार घेतली. यामुळे मतदान होण्यापूर्वीच १७ पैकी तब्बल ६ जागा बिनविरोध करण्यात महायुतीला यश आले आहे. यामध्ये ठाणे, रायगड-रत्नागिरी-सिंधुदुर्ग, यवतमाळ, वर्धा-गडचिरोली-चंद्रपूर, पुणे आणि अहिल्यानगर या जागांचा समावेश आहे. विशेषतः कोकणात भाजप नेते आणि मंत्री नितेश राणे यांनी शेवटच्या दोन तासांत चक्रे फिरवून मविआचे अधिकृत उमेदवार बाळ माने यांची माघार घडवून आणल्याने 'उबाठा' गटाला जोरदार धक्का बसला आहे.

या निवडणुकीसाठी येत्या १८ जून रोजी मतदान आणि २२ जून रोजी मतमोजणी होणार असल्याने संपूर्ण राज्याचे लक्ष या रणधुमाळीकडे लाग-ले आहे. गुरुवारी दुपारी ३ वाजेपर्यंत असलेल्या अर्ज माघारीच्या मुदतीत महायुतीने आपल्या गोटातील बंडखोरी थोपवण्यात मोठे यश मिळवले, तर दुसऱ्या बाजूला मविआच्या गोटात मात्र पूर्णपणे निराशा पसरल्याचे चित्र पाहायला मिळाले.

कोकण स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघात सर्वात मोठा राजकीय भूकंप झाला. येथे मविआचे उमेदवार म्हणून उबाठा गटाचे सुरेंद्र ऊर्फ बाळ माने यांनी अर्ज भरल्यामुळे रंजक लढत होईल असे वाटत होते. मात्र, अर्ज मागे घेण्याची मुदत संपण्यास अवघे दोन तास शिल्लक असताना मंत्री नितेश राणे यांनी बाळ माने यांच्याशी संपर्क साधला. नितेश राणे स्वतः बाळ माने यांना सोबत घेऊन रत्नागिरीच्या जिल्हाधिकारी कार्यालयात पोहोचले आणि तिथे माने यांनी आपला अर्ज मागे घेतला. मविआतील घटक पक्षांनी आपल्याला शेवटपर्यंत साथ दिली नाही आणि निवडणुकीतील घोडेबाजार टाळण्यासाठी आपण हा निर्णय घेतल्याची कबुली बाळ माने यांनी दिली. यानंतर राष्ट्रवादी काँग्रेसचे (अजित पवार) उमेदवार अनिकेत तटकरे यांचा बिनविरोध विजय निश्चित झाला.

पुण्यात शरद पवार गटाची माघार

पुणे स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघातही मोठा राजकीय उलटफेर पाहायला मिळाला. अजित पवार गटाचे ज्येष्ठ नेते दिलीप वळसे-पाटील यांनी शरद पवार यांच्या 'सिल्व्हर ओक' या निवासस्थानी जाऊन त्यांची भेट घेतली होती. या भेटीनंतर पुण्यात राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे उमेदवार श्रीकांत पाटील यांनी आपला उमेदवारी अर्ज मागे घेतला. पक्षाच्या आदेशानुसार आपण माघार घेत असल्याचे पाटील यांनी स्पष्ट केले. त्यामुळे महायुतीचे (अजित पवार गट) उमेदवार आणि माजी खा-सदार संजय काकडे यांचे चिरंजीव विक्रम काकडे यांच्या बिनविरोध निवडीचा मार्ग मोकळा झाला.

उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या प्रक्रियेदरम्यान महायुतीने राज्यभरात आपल्या बंडखोरांना थोपवण्यात यश मि-ळवले. धाराशिव-लातूर-बीडमध्ये भाजप बंडखोर अर्चना गंगणे यांनी अर्ज मागे घेतल्याने आता भाजपचे बसवराज पाटील विरुद्ध काँग्रेसचे महेश देशमुख अशी थेट लढत होईल.

नांदेडमध्ये खासदार अशोक चव्हाण आणि आमदार प्रताप पाटील चिखलीकर यांच्या मध्यस्थीनंतर प्रवीण पाटील चिखलीकर यांनी माघार घेतल्याने भाजपचे अमरनाथ राजूरकर यांचा मार्ग सुकर झाला आहे.

### यांच्यामध्ये होणार लढत

- नाशिक : नरेंद्र दराडे (शिवसेना) विरुद्ध गोकूळ गीते (अपक्ष)
- जळगाव : नंदकिशोर महाजन (भाजप) विरुद्ध शरद तायडे (उबाठा)
- सांगली-सातारा : धैर्यशील कदम (भाजप) विरुद्ध बाळासाहेब पाटील (अपक्ष), अभयसिंह जगताप (शरद पवार गट)
- नांदेड : अमरनाथ राजूरकर (भाजप महायुती) विरुद्ध रामदास पाटील (काँग्रेस)
- भंडारा-गोंदिया : अविनाश ब्राह्मणकर (भाजप) विरुद्ध दिलीप बनसोड (काँग्रेस)
- सोलापूर : राजेंद्र राऊत (भाजप महायुती) विरुद्ध वसंतराव देशमुख (शरद पवार गट)
- अमरावती : प्रवीण पोटे (भाजप) विरुद्ध हर्षदीप देशमुख (काँग्रेस)
- धाराशिव-लातूर-बीड : बसवराज पाटील (भाजप) विरुद्ध महेश देशमुख (काँग्रेस)
- परभणी-हिंगोली : सईद खान (शिवसेना) विरुद्ध डॉ. विवेक नावंदर (उबाठा)
- छत्रपती संभाजीनगर-जालना : सुहास शिरसाठ (भाजप) विरुद्ध गणेश लोखंडे (अपक्ष)
- नागपूर (पोटनिवडणूक) : डॉ. राजीव पोतदार (भाजप) विरुद्ध अतुल लोंढे (काँग्रेस)




## संपादकीय....

### मान्सूनची चाहूल

बहुप्रतीक्षित नैर्ऋत्य मोसमी पाऊस केरळमध्ये दाखल झाला आहे, असे हवामानशास्त्र विभागाने (आयएमडी) गुरुवारी जाहीर केले. साधारणपणे मोसमी पाऊस एक जूनच्या सुमारास केरळमध्ये येतो. यंदा त्याचे आगमन तीन दिवसांनी लांबले आहे. 'मोसमी पाऊस गुरुवारी अरबी समुद्राच्या नैर्ऋत्य व आग्नेय भागांत, पश्चिम-मध्य व पूर्व-मध्य समुद्राच्या काही भागांत, संपूर्ण लक्षद्वीप बेटांवर, केरळ व माहेमध्ये, कर्नाटक व तमिळनाडूच्या काही भागांत, कोमोरिन क्षेत्राच्या उर्वरित भागांत, आग्नेय बंगालच्या उपसागरात आणि नैऋत्य, पश्चिम-मध्य, पूर्व-मध्य व ईशान्य बंगालच्या उपसागराच्या आणखी काही भागांत पुढे सरकला आहे,' असे हवामानशास्त्र विभागाने म्हटले आहे. यंदा देशातील पाऊस दीर्घकालीन सरासरीच्या सुमारे ९० टक्के राहण्याची शक्यता आहे. विषुवृत्तीय प्रशांत महासागराच्या पृष्ठभागाचे तापमान सध्या दीर्घकालीन सरासरीइतके असले, तरी ते वाढत असून, एल निनोच्या स्थितीला जात आहेत. जून महिन्यात एल निनो तुलनेने क्षीण असेल आणि सप्टेंबरमध्ये तो मध्यम किंवा तीव्र होईल, असा अंदाज आहे. 'गेल्या काही दशकांमध्ये झालेल्या अभ्यासातून 'एल निनो'च्या वर्षांमध्ये शेतीला मोठा फटका बसत असल्याचे स्पष्ट झाले आहे. यंदा 'एल निनो'ची परिस्थिती विकसित होत असल्याने पावसाचे प्रमाण कमी राहू शकते. याचे पडसाद अनेक क्षेत्रांवर उमटण्याची शक्यता आहे. 'मध्य व पूर्व प्रशांत महासागरातील समुद्रपृष्ठभागाचे तापमान वाढल्याने निर्माण होणाऱ्या 'एल निनो'चा भारतीय नैर्ऋत्य मोसमी पावसावर प्रतिकूल परिणाम होतो. भारतीय हवामान विभागाच्या ऐतिहासिक नोंदींनुसार, १९५० नंतरच्या सरासरीपेक्षा कमी पावसाच्या ६० टक्के वर्षांचा संबंध 'एल निनो' घटनांशी आढळला आहे.

# पर्यावरणाचा ऱ्हास की विकासाच्या नावाखाली विनाश?

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

दरवर्षी ५ जून रोजी जगभरात जागतिक पर्यावरण दिन साजरा केला जातो.पर्यावरणाचे महत्त्व अधोरेखित करणे,नागरिकांमध्ये जागरूकता निर्माण करणे आणि पृथ्वीच्या संवर्धनासाठी सामूहिक प्रयत्नांना चालना देणे हा या दिवसामागील उद्देश आहे.मात्र पर्यावरण दिनाच्या निमित्ताने वृक्षारोपणाचे कार्यक्रम,परिसंवाद आणि विविध उपक्रम आयोजित केले जात असले तरी प्रत्यक्षात पर्यावरणासमोरील संकट दिवसेंदिवस अधिक गंभीर होताना दिसत आहे.आज मानवाने विकासाच्या शर्यतीत निसर्गाचा इतका मोठ्या प्रमाणावर ऱ्हास केला आहे की त्याचे परिणाम संपूर्ण जगाला भोगावे लागत आहेत.गेल्या काही दशकांमध्ये औद्योगिकीकरण,शहरीकरण आणि वाढती लोकसंख्या यामुळे नैसर्गिक संसाधनांवर प्रचंड ताण निर्माण झाला आहे.जंगलांची मोठ्या प्रमाणावर तोड,डोंगरांची उत्खनने,नद्यांचे प्रदूषण,वाढते हवेतील प्रदूषण आणि प्लास्टिक कचऱ्याचा विळखा यामुळे पर्यावरणाचा समतोल ढासळत आहे. एकेकाळी स्वच्छ आणि समृद्ध असलेली नैसर्गिक परिसंस्था आता मानवी हस्तक्षेपामुळे धोक्यात आली आहे.हवामान बदल हे आजच्या काळातील सर्वात मोठे पर्यावरणीय संकट मानले जाते. पृथ्वीचे तापमान सातत्याने वाढत असून त्याचे परिणाम जगभरात दिसून येत आहेत.अनेक देशांमध्ये विक्रमी उष्णतेच्या लाटा अनुभवास येत आहेत. काही ठिकाणी अतिवृष्टीमुळे पूरस्थिती निर्माण होत आहे,तर काही भागांमध्ये तीव्र दुष्काळामुळे शेती आणि पिण्याच्या पाण्याचे प्रश्न गंभीर बनले आहेत. हिमनद्या वेगाने वितळत असून समुद्राची पातळी वाढत आहे.ही परिस्थिती भविष्यात किनारपट्टीवरील शहरांसाठी मोठा धोका ठरू शकते.भारतातही पर्यावरणीय संकटाची तीव्रता वाढत आहे.दरवर्षी उन्हाळ्यात तापमानाचे नवे विक्रम नोंदवले जात आहेत. अवकाळी पाऊस,गारपीट,चक्रीवादळे आणि अनियमित हवामानामुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होत आहे. शेती उत्पादन घटत असून अन्नसुरक्षेचाही प्रश्न निर्माण होत आहे.ग्रामीण भागापासून महानगरांपर्यंत पर्यावरणाचा प्रश्न सर्वांसाठी चिंतेचा विषय बनला आहे.मुंबईसारख्या महानगरांमध्ये विकास प्रकल्पांच्या नावाखाली मोठ्या प्रमाणात झाडांची कत्तल केली जात आहे.काँक्रीटच्या जंगलांमुळे शहरातील हरित क्षेत्र कमी होत आहे. पावसाळ्यात नाले आणि जलवाहिन्या कचऱ्याने तुंबल्याने पूरस्थिती निर्माण होते.वायू प्रदूषणामुळे श्वसनाचे आजार वाढत आहेत.प्लास्टिक आणि इतर घनकचऱ्याच्या अयोग्य व्यवस्थापनामुळे पर्यावरणासोबतच नागरिकांच्या आरोग्यालाही धोका निर्माण होत आहे. प्लास्टिक प्रदूषण ही देखील एक गंभीर समस्या बनली आहे.प्लास्टिकचा वापर आज जीवनाचा अविभाज्य भाग झाला असला तरी त्याचे दुष्परिणाम अत्यंत घातक आहेत.प्लास्टिक सहज नष्ट होत नसल्याने ते माती, पाणी आणि सागरी पर्यावरणाचे नुकसान करते.नद्या आणि समुद्रात जाणाऱ्या प्लास्टिकमुळे जलचर प्राण्यांचे जीवन धोक्यात आले आहे.अनेक प्राणी प्लास्टिक खाल्ल्यामुळे मृत्युमुखी पडत आहेत. त्यामुळे प्लास्टिकमुक्त जीवनशैली स्वीकारणे ही काळाची गरज बनली आहे.पर्यावरणाचा प्रश्न केवळ सरकार किंवा प्रशासनाच्या प्रयत्नांनी सुटणारा नाही.यासाठी प्रत्येक नागरिकाने जबाबदारी स्वीकारणे आवश्यक आहे. पाण्याचा अपव्यय टाळणे,ऊर्जा बचत करणे, सार्वजनिक वाहतुकीचा वापर वाढविणे,प्लास्टिकचा वापर कमी करणे,कचऱ्याचे वर्गीकरण करणे आणि अधिकाधिक वृक्षारोपण करणे यासारख्या उपाययोजना प्रत्येकाने आपल्या दैनंदिन जीवनात अंगीकारल्या पाहिजेत.पर्यावरण संरक्षणासाठी शाळा,महाविद्यालये,स्वयंसेवी संस्था आणि स्थानिक स्वराज्य संस्था यांनीही सक्रिय भूमिका बजावली पाहिजे.पर्यावरण संवर्धनासाठी केवळ वृक्षारोपण करून चालणार नाही,तर लावलेल्या झाडांचे संगोपन करणे तितकेच महत्त्वाचे आहे. विकास आणि पर्यावरण यांच्यात समतोल राखणारी धोरणे राबविणे आवश्यक आहे.शाश्वत विकास हीच काळाची गरज आहे.आर्थिक प्रगती करताना निसर्गाचे नुकसान होणार नाही याची काळजी घेणे ही प्रत्येक शासनाची आणि समाजाची जबाबदारी आहे. जागतिक पर्यावरण दिन हा केवळ उत्सव साजरा करण्याचा दिवस नाही,तर आत्मपरीक्षण करण्याची संधी आहे.आपण निसर्गाकडून सतत घेत आहोत,परंतु त्याला परत काय देत आहोत,हा प्रश्न प्रत्येकाने स्वतःला विचारण्याची गरज आहे. पर्यावरणाचा ऱ्हास हा केवळ निसर्गाचा प्रश्न नाही,तर तो मानवाच्या अस्तित्वाशी निगडित आहे.आज आपण जागे झालो नाही,तर उद्याची पिढी आपल्याला कधीही माफ करणार नाही.म्हणूनच पर्यावरणाचे संरक्षण ही काळाची गरज नसून मानवजातीच्या अस्तित्वासाठीची अपरिहार्यता आहे.निसर्ग वाचला तरच भविष्य वाचेल,आणि भविष्य वाचवायचे असेल तर पर्यावरण संवर्धनाला सर्वोच्च प्राधान्य द्यावे लागेल.





**– केतन द.भोज**
**सदस्य – मराठी वृत्तपत्र लेखक संघ, मुंबई**

# जागतिक पर्यावरण दिन : विकासाच्या नावाखाली निसर्गाचा गळा घोटणारी व्यवस्था

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

५ जून हा 'जागतिक पर्यावरण दिन' म्हणून जगभर साजरा केला जातो. पर्यावरण संरक्षणाचे महत्त्व जनमानसात रुजविणे, निसर्गाविषयी संवेदनशीलता निर्माण करणे आणि पृथ्वीच्या अस्तित्वासाठी आवश्यक असलेल्या नैसर्गिक साधनसंपत्तीचे जतन करण्याचा संदेश देणे हा या दिवसामागील मुख्य उद्देश आहे. मात्र दुर्दैवाने, आज पर्यावरण दिन हा केवळ औपचारिक कार्यक्रम, सोशल मीडियावरील पोस्ट, झाडे लावण्याचे फोटोसेशन आणि भाषणापुरता मर्यादित राहिलेला दिसतो. प्रत्यक्षात मात्र विकासाच्या नावाखाली जंगलांची कत्तल, नद्यांचे प्रदूषण, डोंगरांची तोड, हवेत वाढणारे विषारी घटक आणि शहरांच्या काँक्रीटीकरणामुळे पृथ्वीचा श्वासच गुदमरू लागला आहे. आज जग एका अभूतपूर्व पर्यावरणीय संकटाच्या उंबरठ्यावर उभे आहे. ग्लोबल वॉर्मिंग, हवामान बदल, पाण्याची टंचाई, वाढते तापमान, असंतुलित पाऊस, चक्रीवादळे, महापुर, दुष्काळ आणि जैवविविधतेचा ऱ्हास ही केवळ वैज्ञानिक अहवालातील शब्दावली राहिलेली नाही, तर ती आता मानवी जीवनाला थेट ग्रासणारी वस्तुस्थिती बनली आहे. भारतासारख्या विकसनशील देशात तर परिस्थिती अधिक गंभीर आहे. कारण येथे लोकसंख्या वाढ, अनियंत्रित शहरीकरण, औद्योगिकीकरण आणि भ्रष्ट व्यवस्थेमुळे पर्यावरणीय समतोल धोक्यात आला आहे.

आज शहरांमध्ये रस्ते रुंदीकरणाच्या नावाखाली हजारो झाडे एका रात्रीत कापली जातात. प्रशासन म्हणते, विकासासाठी आवश्यक आहे. पण हा विकास नेमका कुणासाठी आणि कोणाच्या किंमतीवर? झाडे तोडून, नद्या बुजवून आणि डोंगर फोडून उभे राहणारे सिमेंटचे जंगल खरंच प्रगतीचे प्रतीक म्हणता येईल काय? विकासाचा अर्थ जर फक्त मॉल, उड्डाणपूल, टॉवर्स आणि कारखाने एवढाच उरला असेल, तर आपण भविष्यातील पिढ्यांसाठी मृत्यूचा वारसा तयार करत आहोत, हे स्पष्ट आहे. भारतातील अनेक शहरांची हवा आज धोकादायक पातळीवर पोहोचली आहे. दिल्ली, मुंबई, पुणे, नागपूर यांसारख्या शहरांमध्ये वाढते वाहनप्रदूषण, औद्योगिक धूर आणि धुळीमुळे नागरिकांच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होत आहेत. श्वसनाचे आजार, हृदयविकार, त्वचारोग आणि कर्करोगासारख्या रोगांमध्ये वाढ होत आहे. दुसरीकडे प्लास्टिक प्रदूषणाने नद्या, समुद्र आणि जमीन अक्षरशः गुदमरली आहे. प्लास्टिक बंदीचे कायदे फक्त कागदावर दिसतात, प्रत्यक्षात बाजारपेठेत सर्वत्र प्लास्टिकचा सुळसुळाट सुरूच आहे.

पर्यावरण संवर्धनाच्या बाबतीत शासनाची भूमिका अनेकदा दुटप्पी दिसते. एका बाजूला वृक्षारोपण मोहिमा राबवल्या जातात, तर दुसऱ्या बाजूला मोठ्या प्रकल्पांसाठी हजारो हेक्टर जंगल जमीन उद्योगपतींना दिली जाते. जंगल हे केवळ लाकूड किंवा जमीन नसून ते पृथ्वीचे फुफ्फुस आहेत, हे शासनाला समजत नाही का? पर्यावरणीय मंजुरी देताना अनेक नियम पायदळी तुडविले जातात. लोकांचा विरोध डावलून प्रकल्प रेटले जातात. पर्यावरण संरक्षणाच्या कायद्यांमध्येही अनेकदा उद्योगस्नेही बदल केले जातात. त्यामुळे प्रश्न निर्माण होतो की, शासन खरोखर पर्यावरण वाचवू इच्छिते की केवळ विकासाच्या नावाखाली नैसर्गिक संपत्तीची विक्री करत आहे? आज नद्यांची अवस्था अत्यंत दयनीय झाली आहे. गंगा, यमुना, गोदावरी, कृष्णा, पंचगंगा, नाग नदी अशा अनेक नद्या औद्योगिक रसायने, सांडपाणी आणि प्लास्टिक कचऱ्यामुळे प्रदूषित झाल्या आहेत. नदी स्वच्छतेच्या नावाखाली हजारो कोटी रुपये खर्च होतात; पण प्रत्यक्षात नद्यांचे प्रदूषण कमी होताना दिसत नाही. कारण भ्रष्टाचार, नियोजनाचा अभाव आणि प्रशासनाची उदासीनता हेच या समस्येचे मूळ आहे.




पर्यावरणाचा प्रश्न हा केवळ झाडांचा किंवा नद्यांचा प्रश्न नाही; तो मानवी अस्तित्वाचा प्रश्न आहे. शेतकरी आज हवामान बदलाचा सर्वात मोठा फटका सहन करत आहे. कधी अतिवृष्टी, कधी अवकाळी पाऊस, कधी दुष्काळ तर कधी गारपीट यामुळे शेतीचे मोठे नुकसान होत आहे. शेतकऱ्यांच्या आत्महत्या, अन्नधान्य उत्पादनातील घट आणि वाढती आर्थिक अस्थिरता यामागे पर्यावरणीय असंतुलन हे एक महत्त्वाचे कारण आहे. पण दुर्दैवाने, पर्यावरणीय प्रश्नांना अजूनही दुय्यम महत्त्व दिले जाते. आजची सर्वात मोठी शोकांतिका म्हणजे पर्यावरण संवर्धनाला 'इव्हेंट' बनवले गेले आहे. जागतिक पर्यावरण दिन आला की सरकारी कार्यालये, शाळा, महाविद्यालये, राजकीय पक्ष आणि विविध संस्था झाडे लावण्याचे कार्यक्रम घेतात. फोटो काढले जातात, सोशल मीडियावर पोस्ट टाकल्या जातात आणि दुसऱ्या दिवशी ती रोपे वाळून जातात. पर्यावरण संवर्धन ही सातत्याने चालणारी जीवनशैली असायला हवी, ती केवळ एका दिवसापुरती मर्यादित राहून चालणार नाही.

पर्यावरण वाचविण्यासाठी केवळ शासनावर टीका करून उपयोग नाही, प्रत्येक नागरिकाने स्वतःची जबाबदारीही ओळखली पाहिजे. पाणी वाचविणे, प्लास्टिकचा वापर कमी करणे, सार्वजनिक वाहतुकीचा वापर वाढविणे, झाडांचे संरक्षण करणे, कचऱ्याचे योग्य व्यवस्थापन करणे आणि पर्यावरणपूरक जीवनशैली स्वीकारणे ही प्रत्येकाची सामूहिक जबाबदारी आहे. कारण पृथ्वी ही केवळ आपली मालमत्ता नाही; ती पुढील पिढ्यांचीही आहे. शाळांमध्ये पर्यावरण शिक्षण अधिक प्रभावी करणे आवश्यक आहे. मुलांना केवळ पुस्तकातील धडे शिकवून उपयोग नाही; तर त्यांना प्रत्यक्ष निसर्गाशी जोडणे गरजेचे आहे. वृक्षसंवर्धन, जलसंधारण, जैवविविधता आणि कचरा व्यवस्थापन याबाबत सामाजिक जाणीव निर्माण करावी लागेल. पर्यावरण संरक्षण हे केवळ सरकारी विभागाचे काम नसून समाजाच्या प्रत्येक घटकाने त्यात सहभाग घेतला पाहिजे.

माध्यमांची भूमिकाही येथे अत्यंत महत्त्वाची आहे. अनेकदा मोठ्या उद्योगसमूहांच्या जाहिरातींच्या दबावामुळे पर्यावरणीय प्रश्नांना पुरेसे स्थान दिले जात नाही. वृक्षतोड, नदीप्रदूषण, खाणकामातील भ्रष्टाचार आणि पर्यावरणीय नियमांचे उल्लंघन यावर सातत्याने आवाज उठविणे गरजेचे आहे. कारण स्वतंत्र आणि जबाबदार पत्रकारिताच समाजाला जागृत ठेवू शकते. आज गरज आहे ती पर्यावरणपूरक विकास मॉडेलची. विकास आणि पर्यावरण हे एकमेकांचे शत्रू नाहीत; पण विकासाचा मार्ग निसर्गाशी सुसंवादी असायला हवा. अक्षय ऊर्जा, जलसंधारण, शाश्वत शेती, हरित तंत्रज्ञान आणि सार्वजनिक वाहतूक यांना प्राधान्य दिल्यास विकास आणि पर्यावरण यामध्ये संतुलन साधता येऊ शकते. पण त्यासाठी राजकीय इच्छाशक्ती, पारदर्शक प्रशासन आणि जागरूक नागरिकत्व आवश्यक आहे.



**– प्रवीण बागडे, नागपूर**
भ्रमणध्वनी: ९९२३६२०९१९
ई-मेल: pravinbagde@gmail.com

जागतिक पर्यावरण दिनाच्या निमित्ताने आपण स्वतःला एक प्रश्न विचारला पाहिजे आपण पुढील पिढ्यांना नेमकी कोणती पृथ्वी देणार आहोत? हिरवीगार, स्वच्छ आणि जीवनदायी पृथ्वी की प्रदूषणाने ग्रासलेला, पाण्यासाठी संघर्ष करणारा आणि उष्णतेने होरपळणारा ग्रह? हा निर्णय आजच्या पिढीला घ्यावा लागणार आहे. निसर्गाशी युद्ध करून मानव कधीच जिंकू शकत नाही. कारण शेवटी निसर्ग आपला समतोल स्वतः निर्माण करतो, पण त्याची किंमत मानवजातीला चुकवावी लागते. कोरोना महामारीनेही आपल्याला हेच शिकवले की, निसर्गाचा अतिरेकाने ऱ्हास केल्यास त्याचे परिणाम किती भीषण असू शकतात.

पर्यावरण वाचविणे ही आता केवळ सामाजिक जबाबदारी राहिलेली नाही, तर ती अस्तित्वाची लढाई बनली आहे. त्यामुळे पर्यावरण दिन हा केवळ उत्सव न राहता तो आत्मपरीक्षणाचा दिवस व्हायला हवा. झाडे लावण्यापेक्षा झाडे जगविण्याची मानसिकता निर्माण झाली पाहिजे. विकासाच्या नावाखाली निसर्गाचा गळा घोटणाऱ्या धोरणांविरोधात समाजाने जागृतपणे आवाज उठवला पाहिजे. अन्यथा भविष्यातील इतिहास आपल्या पिढीची नोंद स्वतःच्या विकासाच्या हव्यासापायी पृथ्वी उद्ध्वस्त करणारी पिढी अशी करेल. आपणास व आपल्या परिवारास जागतिक पर्यावरण दिनाच्या हिरव्यागार शुभेच्छा!

चलाफक्त झाडे लावू नका, ती जगवण्याची जबाबदारीही स्वीकारू या

पाण्याचा प्रत्येक थेंब वाचवू या

प्लास्टिकमुक्त आणि प्रदूषणमुक्त भारत घडवू या

निसर्गाचे रक्षण हीच खरी मानवसेवा आहे. भावी पिढ्यांसाठी हिरवीगार, स्वच्छ आणि सुरक्षित पृथ्वी निर्माण करण्याचा संकल्प करू या!

निसर्ग वाचला तरच मानवजातीचे अस्तित्व टिकेल.

# तुकाराम मुंढेंचा कारवाईचा सपाटा कायम; सहा दिवसांत १.५८ कोटींचा मुद्देमाल जप्त, १०२ जणांना अटक, ८६ दुकानांना टाळे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : राज्यातील नागरिकांच्या आरोग्याशी खेळ करणाऱ्यांविरोधात अन्न व औषध प्रशासनाने (एफडीए) कारवाईचा सपाटा सुरूच ठेवला आहे. प्रतिबंधित गुटखा, पान मसाला, भेसळयुक्त आणि निकृष्ट दर्जाच्या अन्न पदार्थांवर व्यापक कारवाई सुरूच आहे. २५ मे ते ३२ मे या कालावधीत राज्यभरातील विविध ठिकाणी करण्यात आलेल्या कारवाईत तब्बल १ कोटी ५८ लाख २८ हजार ६७० रुपयांचा मुद्देमाल जप्त



करण्यात आला असून, १०२ आरोपींना अटक करण्यात आली आहे. तसेच ८६ आस्थापनांना टाळे लावले आहे.

प्रतिबंधित गुटखा-पानमसाल्यावर मोठी कारवाई

अन्न व औषध प्रशासनाने राज्यभरात प्रतिबंधित गुटखा आणि पानमसाल्याविरोधात विशेष मोहीम राबवली. या मोहिमेदरम्यान २७२ ठिकाणी तपासण्या करण्यात आल्या. त्यापैकी १०३ आस्थापनांवर कारवाई करण्यात आली. कोकण विभागात सर्वाधिक ४६ जणांना अटक झाली, तर बृहन्मुंबईत २३, पुण्यात १३, छत्रपती संभाजीनगरमध्ये ८, नागपुरात २, नाशिकमध्ये ५ आणि अमरावतीत ५ जणांना अटक करण्यात आली. या कारवाईत ३४ लाख ५ हजार ४८ रुपयांचा प्रतिबंधित माल जप्त करण्यात आला. अधिकाऱ्यांनी भारतीय न्याय संहितेतील विविध कलमे तसेच अन्न सुरक्षा आणि मानके कायद्यांतर्गत गुन्हे दाखल करून आरोपींना अटक केली आहे.

भेसळयुक्त अन्नपदार्थांवरही कठोर कारवाई

सेफ फूड, सेफ ड्रग्ज महाराष्ट्र या संकल्पनेअंतर्गत अन्न व औषध प्रशासनाने भेसळयुक्त, अस्वच्छ व निकृष्ट दर्जाच्या अन्नपदार्थांची विक्री करणाऱ्यांवरही कठोर कारवाई केली. मुंबई, पुणे, कोल्हापूर, सांगली, सातारा, नाशिक, जालना, बीड, नांदेड, परभणी, सोलापूर, नागपूर, अमरावती, यवतमाळ, वर्धा, रायगड, धुळे आदी जिल्ह्यांमध्ये ७३ आस्थापनांची तपासणी करण्यात आली.

या कारवाईत, आंबे, बुंदी लाडू, खवा, बेकरी पदार्थ, कँडी, दूध व दुग्धजन्य पदार्थ, गूळ, खाद्यतेल, तूप, खजूर, आईस्क्रीमकुल्फी, फ्रोजन डेझर्ट, मसाल्याचे पदार्थ, रंगवलेले खाद्यपदार्थ आदी वस्तूंचा ९०,६३९ किलोंचा साठा जप्त करण्यात आला. या जप्त मालाची किंमत १ कोटी २४ लाख २३ हजार ६२९ रुपये इतकी आहे. संशयित नमुने प्रयोगशाळेत तपासणीसाठी पाठविण्यात आले आहेत.

आरोग्याशी खेळ खपवून घेतला जाणार नाही

अन्न व औषध प्रशासनाचे आयुक्त तुकाराम मुंडे यांनी स्पष्ट इशारा देताना सांगितले की, ''जनतेच्या आरोग्याशी खेळ अजिबात खपवून घेतला जाणार नाही. प्रतिबंधित पदार्थांची विक्री किंवा भेसळयुक्त अन्नपदार्थांचे उत्पादन आढळल्यास संबंधितांवर यापुढे आणखी कठोर कारवाई करण्यात येईल.'' राज्यातील अन्नसुरक्षा आणि सार्वजनिक आरोग्य मजबूत करण्यासाठी अशा धडक मोहिमा पुढेही सुरू राहणार असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# पालखी सोहळ्यात वारकरी, भाविकांना आवश्यक सुविधा देण्याससोबतच स्वच्छतेला प्राधान्य द्यावे : विभागीय आयुक्त शितल तेली-उगले

## विभागीय आयुक्त शितल तेली-उगले यांनी केली पालखी मार्ग व तळांची पाहणी

■ पालखी तळावरील अतिक्रमणे तात्काळ काढावीत
■ भंडीशेगाव येथील सोपानकाका पालखी तळ ३० जून पर्यंत सुयोग्य करावा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : आषाढी शुद्ध एकादशी सोहळा २५ जुलै २०२५ रोजी होणार असून, या सोहळ्यासाठी श्री ज्ञानेश्वर महाराज, संत तुकाराम महाराज पालखी सोहळ्याबरोबर तसेच अन्य संताच्या पालखी सोहळ्यासोबत मोठ्या प्रमाणात वारकरी भाविक येतात. या कालावधीत वारकरी भाविकांना पालखी मार्ग, पालखीतळ, विसावा आणि रिंगण सोहळ्याच्या ठिकाणी पाणी, आरोग्य, सुरक्षा, स्वच्छतेच्या पुरेशा सुविधा उपलब्ध करून देण्याबरोबरच स्वच्छतेला सर्वोच्च प्राधान्य द्यावे, अशा सूचना विभागीय आयुक्त शितल तेली-उगले यांनी दिल्या.







यावेळी जिल्हाधिकारी कार्तिकेयन एस., मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन, अप्पर आयुक्त तुषार ठोंबरे, सहाय्यक पोलीस अधीक्षक प्रशांत डगळे, प्रांताधिकारी सचिन इथापे, विजया पांगारकर, मंदीर समितीचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाचे अभिजीत औटी, कार्यकारी अभियंता अमित निमकर, जिल्हा नियोजन अधिकारी दिलीप पवार, जिल्हा नगर विकास प्रशासन अधिकारी योगेश डोके, उपमुख्य कार्यकारी अधिकारी सूर्यकांत भुजबळ, तहसीलदार सचिन लंगुटे, गटविकास अधिकारी अमोल जाधव, मुख्याधिकारी महेश रोकडे, तसेच संबधित विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

यावेळी विभागीय आयुक्त शितल तेली-उगले म्हणाल्या, पालखी मार्गावरुन पालखी तळांकडे जाणाऱ्या रस्त्यांची वारीपूर्वी दुरूस्ती करावी. पालखी तळावर आवश्यक ठिकाणी मुरूमीकरण, स्वच्छता, मुबलक पाणी पुरवठा, वीज, आरोग्य सुविधा देण्यात याव्यात. नातेपुते येथील संत ज्ञानेश्वर महाराज पालखी तळाच्या वाढीव जागेबाबत तात्काळ कार्यवाही करावी. पालखीतळावरील अतिक्रमणे काढून घ्यावीत. पालखी तळांवर हायमास्ट दिव्यांची संख्या वाढवावी. श्री संत सोपान काका पालखी सोहळ्यासाठी नव्याने उपलब्ध करून देण्यात आलेला भंडीशेगांव येथील पालखी तळावरील जलसंपदा विभागाच्या जुन्या इमारतीबाबत आवश्यक ती कार्यवाही करून ३० जून पर्यंत जुन्या इमारती पाडून त्या ठिकाणी सपाटीकरण व मुरमीकरण करून पालखीतळ स्वच्छ व सुयोग्य करावा, सर्व आवश्यक ठिकाणी शौचालयाची व्यवस्था करावी, अशा सूचनाही विभागीय आयुक्त शीतली उगले यांनी दिल्या.

तसेच पालखी तळांवर कायम स्वरुपी सुविधा देण्याबाबत पालखी-सोहळा प्रमुखांशी चर्चा करुन नियोजन करावे. वारी कालावधीत वैद्यकीय सुविधेबरोबर तज्ञ डॉक्टरांची नेमणूक करावी. ६५ एकर येथे प्रशासनाकडून दिंड्यांना जागा उपलब्ध करुन देण्यात येते. दिवसेंदिवस दिंड्यांची संख्या वाढत असल्याने जागा अपुरी पडत असेल तर पर्यायी जागा उपलब्ध करुन देण्यात यावी, अशा सूचनाही त्यांनी यावेळी दिल्या.

यावेळी जिल्हाधिकारी कार्तिकेयन म्हणाले, पालखी मार्ग व तळांवर सुविधा बाबत पालखी सोहळा प्रमुखांनी सुचविलेल्या कामांना प्राधान्य देवून ती कामे पुर्ण करण्यात येत आहेत. पालखी सोहळे जिल्ह्यात प्रवेश केल्यानंतर सर्व भाविकांना, पालखी मार्ग व तळांवर आवश्यक सुविधा प्रशासनकडून उपलब्ध केल्या जातील असे त्यांनी सांगितले. तसेच जिल्हा प्रशासनाकडून पालखी मार्गावर व तळांवर प्रशासकडून देण्यात येणाऱ्या सुविधांची माहिती दिली.

मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन यांनी पालखी मार्ग व तळांवर जिल्हापरिषदेमार्फत आरोग्य, पिण्याचे पाणी, स्नानगृह, हिरकणी कक्ष, विश्रांती कक्ष महिला भाविकांसाठी देण्यात येणाऱ्या सुविधेबाबत माहिती दिली.

पालखी सोहळ्या बरोबर दिवसेंदिवस दिंड्यांची तसेच वारकरी भाविकांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे व उपलब्ध असणारे पालखीतळ सद्यस्थितीत कमी पडत असल्याने पालखी तळास वाढीव जागा मिळावी, तसेच जर्मन हँगरची संख्या वाढवावी अशी मागणी संत ज्ञानेश्वर पालखी सोहळा विश्वस्त योगी निरंजन दास, पालखी सोहळा प्रमुख ड.राजेंद्र उमाप यांनी यावेळी केली.

यावेळी विभागीय आयुक्त शितल तेली उगले यांनी नातेपुते, माळशिरस, वेळापूर, भंडीशेगाव, वाखरी येथील पालखीतळांची पाहणी केली. तसेच मंदिर जतन व संवर्धन आराखड्या अंतर्गत सुरू असलेल्या व करण्यात आलेल्या कामांची पाहणी करून माहिती घेतली. मंदिर समितीचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी आराखड्या अंतर्गत करण्यात आलेल्या कामांची माहिती दिली.

## पंढरपूर परिसरात भुरट्या चोरांचा सुळसुळाट

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : पंढरपूर शहर व उपनगरामध्ये चोरट्यांनी धुमाकूळ घातला आहे. नागरिकांच्या अंगावरील व घोरपड्याचे प्रमाण वाढले आहे यामुळे नागरी मध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. पोलिसांनी उपनगरामध्ये गस्त वाढवावी अशी नागरिकांतून मागणी होत आहे.

उन्हाळी सुट्टी असल्यामुळे रुक्मिणी नगर मधील राजीव कुलकर्णी हे घराला कुलूप लावून परगावी गेले होते. ही संधी साधून चोरट्याने एक जून रोजी घराची कुलूप तोडून रोग दहा हजार रुपये दहा हजार किम तीच्या चांदीच्या वस्तू अशा एकूण २० हजाराचा मुद्देमाल नापास केला. कुलकर्णी परगाहून आल्यानंतर त्यांना ही घटना घडल्याचे लक्षात आले. त्यांनी याबाबत पंढरपूर शहर पोलीस ठाण्यात चोरट्या विरोध फिर्यादी दाखल केली आहे. पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक गोसावी करीत आहे. अधिक मास असल्यामुळे पंढरपूरमध्ये येण्याचे भाविकांची संख्या वाढली आहे त्यामध्ये एसटी बस स्थानक, श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर , परिसर, चंद्रभागा वाळवंट, दर्शन रांग आधी ठिकाणी भाविकांची मोठ्या प्रमाणावर गर्दी होत आहे. या गरजेचा फायदा घेऊन छोट्या वरून अंगावरचे दागिने व पर्समधील लंपास करण्याच्या घटना घडत आहे त्यामुळे येणाऱ्या भाविकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. तरी पोलिसांनी करडी नजर ठेवून चोरट्यांना जेरबंद करावे अशी भाविकांमधून मागणी होत आहे.

## शरद प्रतिभाशाली सांस्कृतिक प्रतिष्ठानच्या सोलापूर जिल्हाध्यक्षपदी नागेश फाटे यांची नियुक्ती

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर / प्रतिनिधी : शरद प्रतिभाशाली सांस्कृतिक प्रतिष्ठानच्या सोलापूर जिल्हाध्यक्षपदी नागेश फाटे यांची नियुक्ती करण्यात आली आहे.




नुकतेच संस्थेच्या मार्गदर्शक खासदार सुप्रिया सुळे यांच्या मार्गदर्शनाखाली मुंबई येथील संस्थेच्या कार्यालयात संस्थेचे संस्थापक अध्यक्ष कोयनारत्न राजाराम बुवा शेलार, व्यवस्थापक चित्रपट दिग्दर्शक विनोद शिंदे, मुंबई उपनगर अध्यक्ष निर्माता निलेश गुंडाळे, मंगेश पाटील या प्रमुख पदाधिकाऱ्यांच्या हस्ते नागेश फाटे यांना नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले.

संस्थेच्या कार्यकारिणीने सामाजिक बांधिलकी, सांस्कृतिक चळवळीप्रती असलेली सकारात्मक भूमिका, कार्यक्षमता आणि दीर्घ अनुभव यांचा विचार करून नागेश फाटे यांच्यावर ही महत्त्वाची जबाबदारी सोपविली आहे. त्यांच्या नियुक्तीमुळे संस्थेच्या सामाजिक, सांस्कृतिक आणि प्रबोधनात्मक उपक्रमांना अधिक गती मिळेल, असा विश्वास संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केला आहे.

संस्थेच्या वतीने देण्यात आलेल्या नियुक्तीपत्रात सोलापूर जिल्ह्यात सांस्कृतिक चळवळी अधिक प्रभावीपणे राबविणे, कलाकारांना व्यासपीठ उपलब्ध करून देणे, नवोदित कलावंत व प्रतिभावंतांना प्रोत्साहन देणे तसेच संस्थेची ध्येयधोरणे सर्वसामान्यांपर्यंत पोहोचविण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे.

नागेश फाटे यांनी गेल्या अनेक वर्षांपासून सामाजिक व सांस्कृतिक क्षेत्रात सातत्याने कार्य केले असून विविध उपक्रमांच्या माध्यमातून समाजप्रबोधनाचे काम केले आहे. त्यांच्या कार्याचा गौरव करत संस्थेने त्यांच्यावर जिल्हाध्यक्षपदाची जबाबदारी सोपविली आहे.

संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केलेल्या भावनाानुसार, नागेश फाटे यांच्या नेतृत्वामुळे शरद प्रतिभाशाली सांस्कृतिक प्रतिष्ठानच्या कार्याला सोलापूर जिल्ह्यात नवी दिशा मिळेल. संस्थेची मूल्ये, शिस्त आणि सामाजिक बांधिलकी जपत ते निष्ठेने कार्य करतील, असा विश्वासही यावेळी व्यक्त करण्यात आला.

नियुक्तीनंतर नागेश फाटे यांच्यावर विविध सामाजिक, सांस्कृतिक आणि प्रबोधनात्मक कार्यक्रमांचे नियोजन व अंमलबजावणीची जबाबदारी राहणार असून, जिल्हाभरातील कलाकार, साहित्यिक आणि सांस्कृतिक क्षेत्रातील व्यक्तींना एकत्रित करून संस्थेचे कार्य अधिक व्यापक करण्याचा त्यांचा प्रयत्न राहणार असल्याचे सांगण्यात आले.





## विठ्ठल रुक्मिणी मातेच्या चरणी सोन्याचा तुळशीहार अर्पण

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर :०४: श्रीमती गोदाबाई गणपत गोगरे, रा. शिरापूर, ता. मोहोळ, जि. सोलापूर येथील भाविकांनी दिनांक ४ जून रोजी श्री विठ्ठल रुक्मिणी चरणी सुवर्ण तुळशीपानांचा हार अर्पण केला.

सदर हारामध्ये तुळशीपाने नग ३२ व गोल मणी नग ६४ असून त्याचे एकूण वजन ३५.००० ग्रॅम आहे. सदर सुवर्ण हाराची अंदाजित किंमत ₹५,००,८५०/- इतकी आहे.

यावेळी मंदिर समितीच्या वतीने देणगीदार भाविकांचा सन्मान मंदिर समिती सदस्य ह.भ.प. ज्ञानेश्वर देशमुख (जळगावकर) यांच्या हस्ते करण्यात आला.

**औसा पंचायत समितीचे गट विकास अधिकारी अनंद कुमार मिरगणे शेतकऱ्यांच्या सिंचन विहिरीवर....**

## सिंचन विहीर तांत्रिक अडचणीवर 'ऑन द स्पॉट' तोडगा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

औसा प्रतिनिधी/अमर जाधव : औसा पंचायत समितीचे गटविकास अधिकारी यांनी स्वत:सिरसलं येथील सिंचन विहिरीवर जाऊन घेतली मजुरांची ऑनलाईन हजेरी!

सिरसल येथे महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने (मग्रारोहयो) अंतर्गत सुरू असलेल्या सिंचन विहिरीच्या कामावर मजुरांची ऑनलाईन हजेरी (NMMS App) घेण्यामध्ये गेल्या काही दिवसांपासून तांत्रिक अडचण येत होती. मजुरांच्या हजेरीचा हा प्रश्न मार्गी लावण्यासाठी गटविकास अधिकारी मिरगणे औसा (BDO) यांनी स्वतः थेट सिंचन विहिरीच्या कामाच्या ठिकाणी प्रत्यक्ष भेट दिली.

ग्रामीण भागातील मजुरांचे नुकसान होऊ नये आणि कामात खंड पडू नये, यासाठी गटविकास अधिकारी साहेबांनी स्वतः पुढाकार घेतला. विहिरीच्या बांधावर उभे राहून साहेबांनी आपल्या उपस्थितीत मजुरांची ऑनलाईन हजेरी (Online Attendance/KYC Verification) मोबाईल पद्वारे यशस्वीरीत्या पूर्ण केली....




यावेळी सिरसल चे सरपंच प्रकाश पाटील.उपसरपंच बालाजी हांडे.शेतकरी संतोष बळी घोडके, ग्रामस्थ ग्रामपंचायत अधिकारी माधव गिरी,महेश जगताप ग्रामपंचायत कर्मचारी पवार साहेब उपस्थित होते.....

## सराईत वाळु तस्कराची येरवडा कारागृहात रवानगी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : पंढरपूर शहर पोलीस ठाणे हदटीत अवैधपणे वाळू उपसा करून ती बेकायदेशीपणे विक्री व्यवसाय करणारा वाळु तस्कर आणि सराईत गुन्हेगार महेश तानाजी शिंदे रा. इसबावी, पंढरपुर यास एक वर्षाकरीता एम. पी.डी.ए कायदयांर्गत स्थानबध्दतेचे आदेश पारीत केलेने त्यास ताब्यात घेवुन येरवडा मध्यवर्ती कारागृह, पुणे येथे स्थानबध्द करण्यात आले आहे.

सराईत आरोपी महेश शिंदे हा दहशत माजवण्या करीता वाळुचे कारणावरून जिव घेणे हल्ले करणे, लोकांना दमदाटी, मारहाण करून, गौण खनिज (वाळु) चोरी करणे असे गुन्हे केले आहेत. भारतीय न्याय संहिता २०२३ मधीत प्रकरण ६ व १७ मधील अपराधी स्वरूपाची कृत्ये असून सदरची कृत्ये करण्याची त्यास सवय जडली होती. त्याचे विरूध्द अनेकवेळा अवैधपणे वाळु व्यवसाय तसेच शरीराविषयी गुन्हे दाखल होवुन त्यामध्ये अटक करण्यात आली होती. परंतु तो सदर गुन्हयात जामीन मिळवुन अवैध वाळु व्यवसाय अव्याहतपणे सुरूच होता. तो कायदयाला जुमानत नव्हता. म्हणुन पोलीस निरीक्षक श्दशरथ वाघमोडे यांनी स्थानबध्द करणेबाबतचा प्रस्ताव मा. पोलीस अधिक्षक सोलापुर ग्रामीण यांचे मार्फत जिल्हादंडाधिकारी तथा जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांना पाठविणेत आला होता. त्याअनुशंगाने एम. पी.डी.ए कायदयांर्गत स्थानबध्दतेचे आदेश पारीत केले होते.

सदरची कामगीरी पोलीस अधिक्षक अतुल कुलकर्णी, अप्पर पोलीस अधिक्षक विजय कबाडे, सहा. पोलीस अधिक्षक प्रशांत डगळे, पोलीस निरीक्षक संजय जगताप, स्थानिक गुन्हे शाखा, सोलापुर ग्रामीण वरिष्ठ पोलीस निरीक्षक दशरथ वाघमोडे, यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे प्रकटीकरण शाखेचे प्रभारी नितीन जगताप, सपोफौ कल्याण ढवणे, शरद कदम, पोलीस नाईक सचिन इंगळे स्थानिक गुन्हे शाखेचे अनिस शेख, सायबर सेलचे रतन जाधव तसेच जिल्हाधिकारी कार्यालय सोलापुरयांचेकडील विलास म्हेत्रे यांनी केली आहे.

## सभापती अविनाश मडीखांबे यांनी घेतली संविधान बंगला मुंबई येथे रामदास आठवले साहेबांची सदिच्छा भेट



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट/प्रतिनिधी : अक्कलकोट चे नगरसेवक तथा रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया चे ,(आठवले गट) अक्कलकोट तालुका अध्यक्ष अविनाश मडीखांबे यांनी संविधान बंगला मुंबई येथे रामदास आठवले साहेब यांची सदिच्छा भेट घेतली या भेटीत रामदास आठवले साहेब यांनी अक्कलकोट च्या रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाच्या कार्याबद्दल समाधान व्यक्त करून अविनाश मडीखांबे यांचे अक्कलकोट तालुक्यात कार्य अतिशय चांगले आहे असे गौरव उद्गार काढले आणि अविनाश मडीखांबे यांचे अभिनंदन देखील केले. अलीकडेच गेल्या चार दिवसांपूर्वी केंद्रीय मंत्री रामदास आठवले साहेब हे मोटारीने गुलबर्गा कडे जात होते. यावेळी त्यांचे अक्कलकोट, सांगवी,शिरवळ, वागदरी,येथे रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाच्या वतीने असंख्य कार्यकर्ते नागरिक महिला यांनी उत्स्फूर्त स्वागत केले होते. याचा ही उल्लेख रामदास आठवले साहेब या वेळी करून म्हणाले की मला रस्त्यात अक्कलकोट,सांगवी,शिरवळ वागदरी,येथे कार्यकर्त्यांनी भेटून माझे स्वागत करून माझा मान सन्मान केला आहे. या बद्दल मी अतिशय भारावून गेलो आहे.

रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया राष्ट्रीय अध्यक्ष तथा केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदासजी आठवले साहेबांची रिपाई आठवले अक्कलकोट तालुका अध्यक्ष तथा नगरसेवक अक्कलकोट नगर परिषद अविनाश मडिखांबे यांनी आठवले साहेब यांच्या संविधान निवासस्थानी सदिच्छा भेट घेतली या वेळी बोलताना रामदास आठवले साहेब म्हणाले की, अविनाश तू रिपब्लिकन पक्षाचे अक्कलकोट तालुक्यांमध्ये गावोगावी कार्यकर्त्यांचे मोठे जाळे उभे केले आहे या बद्दल तुझे खुप खुप अभिनंदन. असे मत आठवले साहेब यांनी यावेळी व्यक्त केले. आणि अविनाश मडीखांबे यांच्या कार्याचा गौरव केला.

# स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीमध्ये राजेंद्र राऊत, वसंतराव देशमुख यांच्यात दुरंगी लढत

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**







पंढरपूर/प्रतिनिधी : सोलापूर जिल्हा स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीचे वारे वाहू लागले आहेत. या निवडणुकीमध्ये सात उमेदवारांनी अर्ज दाखल केले आहेत. उमेदवारी अर्ज घेण्याची आज शेवटची मुदत आहे. यानंतर निवडणुकीचे चित्र स्पष्ट होणार आहे. या निवडणुकीमध्ये ज्येष्ठ उमेदवार शरदचंद्र पवार राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते मोहिते पाटील गटाचे, धैर्यशील मोहिते पाटील यांचे खंदे समर्थक, वसंत नाना देशमुख यांच्यात लढत होणार आहे. यामुळे पुन्हा पंढरपूरचे नाव चर्चेत असणार आहे. निवडणूक खासदार धैर्यशील मोहिते पाटील यांनी लावली निवडणुकीमध्ये सात उमेदवारांनी अर्ज दाखल केले आहेत. भाजपकडून राजेंद्र राऊत यांनी उमेदवारी दाखल केली असून, राष्ट्रवादी काँग्रेस कडून वसंत नाना देशमुख यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला धनंजय डुकरे यांनी उमेदवार दाखल केला आहे. पाच जणांनी उमेदवारी अर्ज माघार घेतली आहे त्यामध्ये धनंजय डिकोळे, महेश साठे, रमेश बारस्कर, जानकर यांनी आपल्या अर्ज माघार घेतली आहे. मोहिते पाटील गटाचे असणारी राष्ट्रवादी काँग्रेसचे अधिकृत उमेदवार त्यामुळे आता भाजपचे राजेंद्र राऊत, वसंतराव देशमुख यांच्या दुरंगी लढत होणार आहे. पंढरपूरचे नाव चर्चेत राहणारे भाजप विरुद्ध महाविकास आघाडी अशी लढत होणार आहे.

सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी निवडणूक बिनविरोध करण्याचा प्रयत्न केला. मात्र यामध्ये यश आले नाही. या निवडणुकीमध्ये ६१६ मतदारांना मतदानाचा हक्क आहे. यामध्थये भाजप महायुतीकडे ४१६ अधिक मते आहेत. महाविकास आघाडीकडे २०० मते असून, १८ जून रोजी मतदान असून २२ जून रोजी मतमोजणी आहे.

# तापाचे रुग्ण शोधण्यात टाकळीवाडीत जोरदार मोहीम; आरोग्य यंत्रणा सतर्क

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



टाकळीवाडी/प्रतिनिधी : टाकळीवाडी ता शिरोळ परिसरात सध्या तापाच्या रुग्णांची संख्या वाढण्याची शक्यता लक्षात घेऊन आरोग्य विभागाने विशेष सर्वेक्षण मोहीम हाती घेतली आहे.

नुकतेच कुंभारवाडी तालुका पन्हाळा येथे एका गावामध्ये शंभर तापाचे रुग्ण आढळल्यामुळे आरोग्य यंत्रणा सतर्क झाली आहे.

गावातील प्रत्येक घराला भेट देऊन ताप, सर्दी, खोकला तसेच इतर संसर्गजन्य आजारांची लक्षणे असलेल्या नागरिकांची माहिती गोळा केली जात आहे.

आरोग्य कर्मचाऱ्यांच्या पथकांकडून घरोघरी जाऊन नागरिकांची तपासणी करण्यात येत असून तापाची लक्षणे आढळणाऱ्या रुग्णांना तात्काळ उपचार व आवश्यक मार्गदर्शन दिले जात आहे. तसेच डेंग्यू, मलेरिया यांसारख्या आजारांबाबत जनजागृतीही करण्यात येत आहे.

आरोग्य विभागाने नागरिकांना स्वच्छतेची काळजी घेण्याचे, पिण्याचे पाणी उकळून वापरण्याचे तसेच ताप आल्यास त्वरित जवळच्या आरोग्य केंद्राशी संपर्क साधण्याचे आवाहन केले आहे. गावातील सार्वजनिक ठिकाणे व परिसर स्वच्छ ठेवण्यासाठी ग्राम पंचायत प्रशासनाकडूनही विशेष उपाययोजना करण्यात येत आहेत.

आरोग्य यंत्रणा पूर्णपणे सतर्क असून कोणत्याही परिस्थितीला सामोरे जाण्यास सज्ज असल्याची माहिती संबंधित अधिकाऱ्यांनी दिली. या मोहिमेमुळे संभाव्य साथीच्या आजारांवर नियंत्रण मिळविण्यास मदत होणार असल्याचा विश्वास टाकळी प्राथमिक आरोग्य केंद्राचे मुख्य आरोग्य अधिकारी डॉ. आशिष कदम यांनी केली.

नितीन कांबळे हेल्थ इन्स्पेक्टर तसेच या सर्वेसाठी आशा स्वयंसेविका सौ सुवर्णा माने, सौ लता निर्मळे, सौ छाया बळे यांनी जोरदार मोहीम राबवली.यांचे गावांमध्ये कौतुक होत आहे.




# खामसवाडी येथे धार्मिक पर्यटनासाठी गेलेल्या ३५ भाविक भक्तांचा हनुमंत पाटुळे यांच्या हस्ते सत्कार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

हनुमंत पाटुळे/कळंब प्रतिनिधी : कळंब तालुक्यातील खामसवाडी येथील धार्मिक पर्यटनासाठी गेलेल्या ३५ भाविक भक्तांचे खामसवाडी येथील साठे चौकात स्वागत करण्यात आले.




गेल्या एक महिन्यापासून हे भाविक भक्त धार्मिक पर्यटनासाठी महाराष्ट्र, उत्तर प्रदेश, उत्तराखंड (केदार नाथ, बद्रिनाथ),मध्य प्रदेश, गुजरात राजस्थान, पंजाब, जम्मू कश्मीर (वैष्णवी देवी),आणि नेपाळमधील प्रसिद्ध अशा धार्मिक क्षेत्राच्या ठिकाणी दर्शन करून आल्याबद्दल त्यांचे ग्रामस्थ या नात्याने मनःपूर्वक स्वागत करून अभिनंदन केले.

यावेळी ट्रॅव्हल्सचे चालक व वाहक यांनी अतिशय चांगल्या पद्धतीने सेवा दिल्याबद्दल त्यांचा मानव अधिकार आंदोलन संघटनेचे संस्थापक अध्यक्ष मा. हनुमंत भाऊ पाटुळे यांच्या हस्ते शाल श्रीफळ पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. तसेच यात्रेमध्ये गावातील एकूण ३५ भाविक भक्त यात्रेकरू धार्मिक दर्शनासाठी गेले होते. त्यांचाही यावेळी पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.

या वेळी हभप श्री.बाळासाहेब मुळुक, आंगद रोहिले, बन्सी दादा शेळके ( सर) अजिनाथ सौदागर,आमोल रोहिले, शिवाजी शेळके, सुकुमार रोहीले, भागवत रोहिले, सुमन वैद्य,अलका तुकाराम शेळके, शंकर आबा गरड, पिंटू निर्फळ मीराबाई पांचाळ, स्वप्निल शेळके यांच्या सह ग्रामस्थ व भाविक भक्त यात्रेकरू मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## केंद्रीय संसदीय कामकाज व अल्पसंख्यांक कार्य मंत्री मा. किरेन रिजिजू यांची आज नवी दिल्ली येथे घेतली भेट



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : २८ जून रोजी महाड येथे होणाऱ्या राज्यस्तरीय सामाजिक न्याय परिषदेस प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहण्याचे निमंत्रण मा. मंत्र्यांना देण्यात आले. तसेच विवेक विचार मंचाच्या विविध उपक्रमांची, सामाजिक न्याय परिषदेची आणि चवदार तळे सत्याग्रहाच्या शताब्दी वर्षानिमित्त आयोजित करण्यात येणाऱ्या कार्यक्रमांची सविस्तर माहिती दिली तसेच महाराष्ट्रातील सामाजिक विषयांवर चर्चा केली.

याच प्रसंगी मा. मंत्री यांच्या हस्ते राज्यस्तरीय सामाजिक न्याय परिषदेच्या पोस्टरचे अनावरण करण्यात आले.

मा. किरेन रिजिजू यांनी सामाजिक न्याय परिषदेस उपस्थित राहण्याबाबत सकारात्मक प्रतिसाद दिला. यावेळी मंचाचे कार्यकर्ते श्री. दीपराज पाटील हे देखील उपस्थित होते.

## ८२ व्या वाढदिवसानिमित्त ग्रामस्थांकडून जंगी सत्कार; सामाजिक कार्याचा गौरव

# निवृत्ती सुरवसे म्हणजे माणसातील देवमाणूस : कमलाकर सोनकांबळे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट/प्रतिनिधी : गोगांव येथील कलेश्वर देवस्थान ट्रस्टचे उपाध्यक्ष, ज्येष्ठ समाजसेवक आणि सर्वधर्मसमभाव जपत समाजसेवेचा वसा जपणारे निवृत्ती सुरवसे बिराजदार यांच्या ८२ व्या वाढदिवसानिमित्त ग्रामस्थ, ग्रामपंचायत आणि विविध सामाजिक संस्थांच्या वतीने त्यांचा जंगी सत्कार करण्यात आला. या प्रसंगी परिसरातील नागरिक, ग्रामस्थ आणि विविध क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी भाजपा तालुका उपाध्यक्ष प्रदीप जगताप हे होते. प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते श्री कलेश्वर महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. त्यानंतर निवृत्ती सुरवसे बिराजदार यांचा शाल, श्रीफळ, पुष्पहार आणि गौरवचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी उपसरपंच कमलाकर सोनकांबळे, प्रदीप जगताप, सूर्यकांत जिरगे, कल्याणराव बिराजदार, कल्लपा वाडे, बाबुराव बिराजदार उपस्थित होते





गावातील ५१ ज्येष्ठ नागरिकांचाही सुरवसे परिवाराच्या वतीने सन्मान करण्यात आला.

यावेळी बोलताना उपसरपंच कमलाकर सोनकांबळे यांनी निवृत्ती सुरवसे यांच्या कार्याचा गौरव करताना सांगितले की, निवृत्ती तात्या सुरवसे हे केवळ एक व्यक्तिमत्त्व नसून समाजासाठी प्रेरणास्थान आहेत. गेली पाच दशके त्यांनी श्री कलेश्वर महाराजांची निस्वार्थ सेवा केली आहे. त्याचबरोबर समाजातील गोरगरीब, वंचित, शेतकरी आणि सर्वसामान्य नागरिकांच्या प्रश्नांसाठी ते सातत्याने धावून गेले आहेत. गावातील कोणत्याही व्यक्तीला अन्याय झाला तर त्याच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहण्याची त्यांची वृत्ती आहे. त्यामुळेच त्यांना गावात 'माणसातील देवमाणूस' म्हणून ओळखले जाते.

ते पुढे म्हणाले की, 'एक गाव - एक पाणवठा' या विचारधारेचा अंगीकार करून सर्व जाती-धर्मातील लोकांमध्ये एकोपा निर्माण करण्यासाठी त्यांनी आयुष्यभर प्रयत्न केले.

सामाजिक सलोखा, बंधुभाव आणि मानवतेची शिकवण देणारे त्यांचे कार्य युवा पिढीसाठी आदर्शवत आहे. गावातील अनेक विकासकामांमध्ये त्यांचे मोलाचे योगदान असून जनसेवा हेच त्यांचे जीवनध्येय राहिले आहे.

निवृत्ती सुरवसे यांनीही सत्काराबद्दल ग्रामस्थांचे आभार मानत, समाजाची सेवा करत राहणे हेच माझे कर्तव्य असून पुढील काळातही लोकहितासाठी कार्यरत राहीन, अशी भावना व्यक्त केली.

या कार्यक्रमास गावातील विविध समाजघटकांचे प्रतिनिधी, महिला, युवक आणि ज्येष्ठ नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमामुळे गावात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी आयोजक सय्यद नदाफ, नितीन गायकवाड, असलम मुल्ला, शाम पाटील,प्रदीप जगताप, विकास सुरवसे, शाम बाबर, गणेश जगताप, विजयकुमार गायकवाड आदींनी विशेष परिश्रम घेतले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संजय सुरवसे सर यांनी केले, तर महादेव सोनकवडे यांनी उपस्थितांचे आभार मानले.

### निवृत्ती सुरवसे यांचे कार्य युवा पिढीसाठी प्रेरणादायी

**गावातील सर्वसामान्य नागरिकांच्या समस्या सोडविण्यासाठी सदैव तत्पर असणारे निवृत्ती सुरवसे यांनी आयुष्यभर सामाजिक बांधिलकी जपत कार्य केले आहे. धार्मिक सेवा, जनसेवा आणि सामाजिक ऐक्य यांचा सुंदर संगम त्यांच्या कार्यातून दिसून येतो. त्यामुळेच आजही गावातील नागरिक त्यांच्याकडे विश्वासाने पाहतात आणि त्यांना आदर्श समाजसेवक म्हणून मानाचे स्थान देतात.**